## नियमित दिवाणी दावा क्र. १६/२०२४ आदेश निशाणी १६ खाली.

(पांडुरंग व इतर वि. नवनाथ व इतर)

वादी क्र. १ ते ८ यांनी प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम पारीत होवून मिळण्या करीता दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**वादीचे अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणेः–**

२. मौजे वडाळी, ता. शिरुर कासार, जि. बीड येथिल खालील मिळकती ह्या प्रस्तुत अर्जातील वादग्रस्त मिळकती असून यापुढे सदर मिळकतीस दावा मिळकती असे संबोधले आहे. (वादींनी दावा मिळकतीचे चतुःसिमा पुर्वक वर्णन अर्ज परीच्छेद क्र. २ मध्ये नमुद केले आहे.)

| अ.क्र. | जुना मिळकत नंबर | नवा मिळकत नंबर | वादग्रस्त क्षेत्र |
|---|---|---|---|
| १. | ६४/१ | ४२८ | २५ X ७०<br>पु.प. २५ फुट<br>द.उ.७० फुट(वादी नं.३ व ४) |
| २. | i) ६१ | २५६ | ४० X २४<br>पु.प. ४० फुट<br>द.उ.२४ फुट (वादी नं.५ व ६) |
| | ii) ६१ | २५६ | ९० X १०<br>पु.प. ९० फुट<br>द.उ.१० फुट(वादी नं.३ व ४) |

| | | | |
|---|---|---|---|
| | iii) ६१ | २५६ | ६६ X २४<br>पु.प. ६६ फुट<br>द.उ.२४ फुट(वादी नं.७ व ८) |
| ३. | ६२ | २५८ | ३० X ३०<br>पु.प. ३० फुट<br>द.उ.३० फुट(वादी नं.१ ते ४) |

३. वर अर्जात नमुद दावा मिळकती ह्या सहन जागा व घर मिळकती असुन या मिळकती ह्या एकत्रीकरण योजनेमध्ये गावठाणामध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. दावा मिळकतींचा पूर्वीचा सर्व्हे क्र. १७ व नवीन गट क्र. १६९ असा आहे. दावा मिळकती गट नंबर १६९ पैकी २१ गुंठे जमीन वडाळी गावासाठी गावठाण म्हणुन समाविष्ट करण्यात आली आहे. सदर मिळकतीचे भूखंडाना नवीन व जुने घर क्रमांक देण्यात आले आहेत. सदर भूखंडामध्ये वडाळी गावातील नागरिकांनी घरे बांधली आहेत. दावा मिळकतीपैकी अनुक्रमांक १ व २ वरील मिळकती वादी क्र.३ ते ८ यांना सन २००६ मध्ये तत्कालीन ग्रामसेवक व सरपंच यांनी रितसर चौकशी करुन राहण्यासाठी दिली आहे. तर अनुक्रमांक ३ वरील मिळकत वादी क्र.१ ते ४ यांनी दिनांक १५/०७/२००३ रोजी भानुदास विठोबा गायकवाड यांचेकडुन खरेदी केली आहे. यानंतर अनुक्रमांक १ ते ३ या दावा मिळकती वर नमुद केल्याप्रमाणे वादी क्र. १ ते ८ यांचे ताबे वहिवाटीत आहे. वादी क्र.३, ५ व ७ यांना वादी क्र.१ विरुध्द अनुक्रमांक १ व २ वरील दावा मिळकती संदर्भात मालकी हक्क जाहीर होवुन निरंतर मनाई हुकुम

मिळण्याकरिता दावा क्र. १०४/२०१० दाखल केला होता. तो दिनांक २१/०७/२०१४ रोजी मंजुर करण्यात आला आहे. त्यानुसार वादी क्र. ३ ते ८ हे अनुक्रमांक १ व २ वरील दावा मिळकतीचे मालक व कब्जेदार झाले आहेत.

४. वादींचे पुढे असे कथन आहे की, वरील प्रमाणे दावा मिळकत क्र.१ ते ३ या मिळकती वादी क्र.१ ते ८ यांचे ताबे वहिवाटीत असुन वादीने दावा मिळकतीमध्ये बांधकाम करित असतांना दिनांक २२/१०/२०२३ व १२/१२/२०२३ रोजी प्रतिवादींनी वादीचे बांधकाम रोखले. त्याअनुषंगे पोलीस स्टेशनला तक्रार दिली असुन अदखलपात्र गुन्ह्याची नोंद झाली आहे.

५. प्रतिवादी क्र.१ व ५ यांनी वादी क्र.१, ३ व ७ यांचे विरुध्द नि.दि.दावा ११०३/२०१९ हा दावा मालकी हक्क जाहीर होवुन मिळण्याकरिता व निरंतर मनाई हुकुम मिळण्याकरिता दाखल केला आहे. सदर दाव्यात प्रतिवादींनी निशाणी ५ वर तात्पुरता मनाई मिळणेचा अर्ज दाखल केला होता. तो नामंजुर करण्यात आला आहे. त्यामुळे प्रतिवादी हे वादींना त्रास देवुन दावा मिळकतीमधुन बेदखल करण्याच्या प्रयत्नात आहेत. मुळात प्रतिवादींचा दावा मिळकतीमध्ये कोणताही हक्कसंबंध नाही. गट नं.१६९ मधील २१ आर गावठाणाकरिता दिलेले क्षेत्र ७/१२ उताऱ्यावरुन कमी झाले नसल्याचा गैरफायदा घेवुन प्रतिवादी हे वादी क्र. १ ते ८ चे दावा मिळकतीवरील बांधकामास हरकत अडथळा निर्माण करित आहेत. करिता, वादींनी प्रस्तुतचा अर्ज

दाखल करुन प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी वादी क्र.१ ते ८ यांचे वर नमुद केल्याप्रमाणे दावा मिळकत क्र.१ ते ३ वरील शांततामय ताबा वहिवाटण्यास हरकत अडथळा करु नये असा तात्पुरता मनाई आदेश दाव्याच्या अंतिम निकालापावेतो पारित करण्याची विनंती केली आहे.

६. वादी क्र. १ ते ८ चे पुढे असे कथन आहे की, ते दावा मिळकतीचे कब्जे वहिवाटीत असुन प्रतिवादी हे त्यांचे दावा मिळकती वरील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा करीत आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादी विरुध्द अर्जातील मागणीप्रमाणे ताकीद न दिल्यास प्रतिवादी हे वादी क्र. १ ते ८ यांना दावा मिळकती मधुन बेदखल करतील. तसे झाल्यास वादी क्र. १ ते ८ यांचे अपरिमित असे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच प्रथमदर्शनी केस ही वादीच्या बाजुने असुन सोयीचे पारडे देखील वादीच्या बाजुने आहे. करीता, शेवटी वादी क्र. १ ते ८ यांनी प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास प्रार्थिले आहे.

७. प्रतिवादी क्र.१ ते ५ हा दाव्यात हजर झाले. परंतु, त्यांनी वेळेत म्हणणे न दाखल केल्याने प्रस्तुतचा अर्ज त्यांचे म्हणणे विना चालविण्यात आला.

८. वरीलप्रमाणे वादीचा अर्ज, दाखल कागदपत्रे पाहता तसेच वादी यांचे सुविद्य विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकता खालील मुद्दे माझे विचाराधीन आहेत. त्यावरील निष्कर्ष व त्यांची कारणमिमांसा खालीलप्रमाणे.

| अ.न. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी सकृतदर्शनी केस त्यांचे बाजूने असल्याचे शाबीत करतात काय? | होय. |
| २ | तुर्तातुर्त ताकिद न दिल्यास वादीचे अपरिमित नुकसान होईल काय? | होय. |
| ३ | न्यायाचा तोल त्यांचे बाजूने असल्याचे वादी शाबीत करतात काय? | होय. |
| ४ | काय आदेश? | अर्ज मंजुर. |

## कारणमिमांसा

९. वादी क्र. १ ते ८ यांचे तर्फे विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. वादीने प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठ्यर्थ अभिलेखावर दावा मिळकतीचे ८ अ चे उतारे, खरेदीखताची प्रत, कराच्या पावत्या, अदखलपात्र गुन्ह्याची प्रत, नकाशा, नि.दि.दावा क्र. १०४/२०१० मधील न्यायनिर्णय व हुकुमनामा, नि.दि.दावा क्र.११०३/२०१९ मधील निशाणी ५ व त्यावरील आदेशाची प्रत दाखल सादर केली आहे.

**मुद्दा क्रमांक १ ते ३–**

१०. प्रस्तुतचा तुर्तातुर्त ताकिदीचा अर्ज निकाली करते समयी वादी क्र. १ ते ८ यांनी त्यांची प्रथमदर्शनी केस म्हणजेच दावा दाखल करते समयी दावा मिळकतीवरील ताबे वहिवाट व त्यास प्रतिवादी करित असलेला हरकत अडथळा शाबीत करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगे अभिलेखावरील वादी क्र. १ ते ८ यांचे कथनांचे अवलोकन केले

असता असे दिसुन येते की, वादीच्या मते दावा मिळकती पैकी अनुक्रमांक १ व २ वरील मिळकती या वादी क्र.३ ते ८ यांना ग्रामपंचायत कार्यालय वडाळी यांनी सन २००६ साली राहण्यासाठी दिल्या असुन अनुक्रमांक ३ वरील मिळकत ही वादी क्र.१ ते ४ यांच्या खरेदीची आहे. उलटपक्षी, प्रतिवादींनी वादीच्या अर्जास म्हणणे दाखल करुन विरोध दर्शविला नाही अथवा बचावात कोणताही पुरावा सादर केलेला नाही.

११. वादी क्र. १ ते ८ यांचे अर्जातील वर नमुद कथने व अभिलेखावर उपलब्ध पुराव्याचे अवलोकन केले असता वादी क्र. १ ते ८ यांचे अभिलेखावर वादग्रस्त घर मिळकतीचे गाव नमुना आठ चे उतारे दाखल केले आहे. सदर उताऱ्यांवर वादी कथन करित असल्याप्रमाणे वादी क्र.१ ते ८ चे नावे वादीने अर्जात कथन केल्याप्रमाणे अनुक्रमांक १ ते ३ या मिळकतींना नोंद आहेत. तसेच दिनांक १५/०७/२००३ चे खरेदीखतावरुन वादी क्र. १ व ३ यांनी दावा मिळकती पैकी अनुक्रमांक ३ वरील मिळकत पांडुरंग बाबुराव डिसले यांच्याकडुन खरेदी केल्याचे दिसुन येते. तसेच वादींनी दावा मिळकत घर क्रमांक मिळकती संदर्भात ग्रामपंचायत कार्यालय वडाळी यांनी कर आकारणी केल्याबाबत आणि त्याअनुषंगे कर भरल्याचे पावत्या सादर केल्या आहेत. त्यावरुन वादी बऱ्याच वर्षापासुन वादग्रस्त मिळकती संदर्भात ग्रामपंचायत कार्यालयात कर भरत असल्याचे दिसुन येते. तसेच नियमित दिवाणी दावा क्र.१०४/२०१० या प्रकरणातील न्यायनिर्णयात वादी क्र.३, ५ व ७ हे दावा मिळकती पैकी अनुक्रमांक १ व

२ या मिळकतीचे मालक व वहिवाटदार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे. उलटपक्षी, प्रतिवादींनी दाखल केलेला नि.दि.दावा क्र.११०३/२०१९ या प्रकरणातील निशाणी ५ वर पारित करण्यात आलेल्या आदेशाच्या प्रतीवरुन प्रतिवादींनी वादी विरुध्द दाखल केलेला ताकीद अर्ज न्यायालयाने फेटाळलेला आहे.

१२. एकंदरीत, वादी तर्फे अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन प्रथमदर्शनी वादी क्र. १ ते ८ हे अर्जात कथन केल्याप्रमाणे दावा मिळकत अनुक्रमांक १ ते ३ वरील मिळकतीचे ताबे वहिवाटीत असुन अभिलेखावर दाखल अदखलपात्र प्रतीवरुन वादी क्र. १ ते ८ यांचे दावा मिळकती वरील कब्जे वहिवाटीस प्रतिवादी यांनी हरकत अडथळा केल्याचे शाबीत होते. अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र.१ ते ५ विरुध्द वादीच्या मागणी प्रमाणे ताकीद न दिल्यास वादी क्र.१ ते ८ यांना त्यांच्या ताब्यातील दावा मिळकती वहिवाटुन उपभोग घेता येणार नाही. परिणामी, वादी क्र. १ ते ८ यांचे नुकसान होणार आहे. वरील परिस्थितीत न्यायाचा कौल देखील वादी क्र. १ ते ८ यांचे बाजुने दिसुन येतो. करीता मुद्दा क्र. १ ते ३ चे उत्तर मी होकारार्थी नोंदविले आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीताः–</u>**

१३. मुद्दा क्र. १ ते ३ चे विवेचनावरुन वादी क्र. १ ते ८ यांनी दावा दाखल करते समयी दावा मिळकतीवरील त्यांची वहिवाट, प्रतिवादी करीत असलेला हरकत अडथळा, प्रथमदर्शनी केस व अर्ज नामंजुर झाल्यास होणारे नुकसान या तिनही बाबी

प्रथमदर्शनी शाबीत केल्या आहेत. त्यामुळे वादी क्र. १ ते ८ हे त्यांचे मागणी प्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ५ विरुध्द दाव्याचा अंतिम निकाला पावेतो तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश पारीत होवुन मिळण्यास पात्र आहे. करीता, मुद्दा क्र. ४ चे उत्तरार्थ मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.१ ते ५ यांनी स्वतः अथवा इतरांमार्फत वादी क्र. १ ते ८ यांचे दावा मिळकतीवरील कब्जा वहिवाटीस कोणत्याही मार्गाने हरकत अडथळा करु नये अशी तुर्तातुर्त ताकिद दाव्याचा अंतिम निकाला पावेतो प्रतिवादी क्र. १ ते ५ यांना देण्यात येते.

३. प्रस्तूत अर्जाचा खर्च दाव्याचे अंतिम निकालावर अवलंबून आहे.

AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Digitally signed by AKSHAY SAMBHAJI JAGTAP
Date: 2025.04.09 17:56:32 +0530

**(अ.सं. जगताप)**

दिनांक ०९/०४/२०२५

दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
शिरूरकासार.

“I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order”.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | : | 09/04/2025 |
| Transcribed on | : | 09/04/2025 |
| Checked & signed on | : | 09/04/2025 |

SAGAR SOPANRAO AJABE

Digitally signed by SAGAR SOPANRAO AJABE
Date: 2025.04.09 17:57:06 +0530

**[Sagar S. Ajabe]**
Stenographer Grade-3